**ठळक बातम्या**

- शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर बैठकीनंतर प्रसिद्ध झालेल्या तिएनजीन जाहीरनाम्यात पहलगाम हल्ल्याचा तीव्र निषेध

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्याशी द्विपक्षीय चर्चा सुरु

- व्यावसायिक वापराचे गॅस सिलेंडर साडे एक्कावन्न रुपयांनी स्वस्त

- मुंबईत मराठा आरक्षण आंदोलनाचा जनजीवनावर परिणाम, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसरात वाहतूक ठप्प

**आणि**

- देशाच्या उत्तर भागात पावसामुळे जनजीवन विस्कळीत

**<><><><>**

चीनमधे तिएनजीन इथं सुरू असलेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर बैठकीनंतर तिएनजीन जाहीरनामा प्रसिद्ध झाला. यात दहशतवादाविरोधात स्पष्ट संदेश देण्यात आला असून भारताच्या प्रादेशिक सहकार्य आणि नवोन्मेष क्षेत्रातल्या योगदानाची दखल घेण्यात आली आहे. शांघाय सहकार्य संघटनेच्या सदस्य देशांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध केला असून या हल्ल्या मरण पावलेल्यांच्या कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त केल्या आहेत. हल्ला घडवून आणणाऱ्यांना जबाबदार धरायला हवं अशी स्पष्ट भूमिका सर्व देशांनी घेतली तसंच दहशतवादाविरोधात लढण्यासाठी सर्व देश वचनबद्ध आहेत असं सांगितलं. मे २०२५ मधे शांघाय सहकार्य संघटनेच्या थिंक टॅंक फोरम भारतात यशस्वी आयोजन केल्याबद्दल सदस्य देशांनी भारताचं अभिनंदन केलं.

**<><><><>**

चीनमधल्या तीएनजीन इथं शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर बैठकीच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यात द्विपक्षीय चर्चा सुरू आहे. प्रधानमंत्री मोदी आणि पुतीन यांनी बैठकीच्या ठिकाणापर्यंत एकत्र प्रवास केला. पुतीन यांच्यासोबतची चर्चा नेहमीच अर्थपूर्ण असते, भारत आणि रशियाचे

संबंध वैश्विक शांतीसाठी महत्त्वाचे आहेत, असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे.

**- - होल्ड बाईट प्रधानमंत्री - -**

**- <><><><>**

तेल वितरण कंपन्यांनी व्यावसायिक वापराच्या गॅस सिलिंडरचे दर ५१ रुपये ५० पैशांनी कमी केले आहेत. त्यानुसार १९ किलो वजनाचे व्यावसायिक गॅस सिलेंडर आता नवी दिल्लीत १ हजार ५८० रुपयांना तर मुंबईत पंधराशे एकतीस रुपये पन्नास पैशांना उपलब्ध असतील. घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरच्या दरांमध्ये मात्र कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

**<><><><>**

केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी आज नवी दिल्ली इथं इंडिया मोबाईल कॉँग्रेस - आयएमसी २५ ऍप्लिकेशनचं उद्घाटन केलं. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सूचना, सुधारित नेटवर्किंग यांचा या ऍप्लिकेशनमधे समावेश आहे. संपर्क साधण्यासाठी, एक्सप्लोर करण्यासाठी वापरत्यांना हे ऍप उपयोगी पडणार आहे. नवव्या इंडिया मोबाईल कॉँग्रेसचं आयोजन ८ ते ११ सप्टेंबर दरम्यान नवी दिल्लीतल्या यशोभुमी कन्वेन्शन सेंटर इथं केलं जाणार आहे.

**<><><><>**

या तिमाहीत जीडीपी वाढीचा दर ७ पूर्णांक ८ टक्के राहिला त्यावरुन अर्थव्यवस्थेचं व्यवस्थापन प्रधानमंत्री नरेंद्र मोदींपेक्षा इतर कोणीही चांगल्या प्रकारे करू शकत नाही, हे सिद्ध झालं असं केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी नवी दिल्लीतील भगवान बिरसा मुंडा भवन इथे बिरसा मुंडा पुतळ्याचं अनावरण केल्यानंतर वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. प्रधानमंत्री मोदी भारतीय अर्थव्यवस्था सर्वोत्तम पद्धतीने चालवत आहेत असं जगातील अव्वल अर्थशास्त्रज्ञ म्हणत आहेत. भारताला स्वावलंबी बनवण्यासाठी मेक इन इंडियाला प्रोत्साहन देणे आणि स्वदेशीचा अवलंब करणे आवश्यक आहे. असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी मुंबईच्या आझाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनाचा आज चौथा दिवस आहे. आंदोलनातले कार्यकर्ते मोठ्या संख्येने जमा झाल्यामुळे देशाची आर्थिक राजधानी - मुंबईच्या जनजीवनावर परिणाम झाला आहे. याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून…

- ***- होल्ड… व्हीसी- -***

*(मुंबईच्या सीएसएमटी परिसरात आंदोलकांची गर्दी वाढल्यानं या परिसरातल्या सर्व रस्त्यांवरची वाहतूक ठप्प झाली आहे. जे. जे. उड्डाणपूल आणि हुतात्मा चौक मार्गे सीएसएमटीला येणारे रस्ते वाहतुकीसाठी बंद केले आहेत. मंत्रालयासमोरचा मार्ग आणि मादाम कामा रस्ता ते मरीन ड्राइव्ह जंक्शन वाहतुकीसाठी बंद आहे. या मार्गावरची वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली आहे. पूर्व मुक्त मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. सीएसएमटी परिसरातली बेस्ट वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मंत्रालयाकडे जाणाऱ्या नवी मुंबई महापालिका परिवहन सेवेच्या सर्व बस आंदोलन संपेपर्यंत बंद राहणार आहेत. भगवा फेटा घातलेल्या आंदोलकांचे थवे दक्षिण मुंबईतल्या फोर्ट आणि मरीन ड्राईव्ह परिसरात घोषणा देत फिरताना दिसत आहेत. काही आंदोलकांनी मध्यरेल्वेच्या छत्रपती शिवाजी टर्मिनसमधे रुळांवर उतरुन तसंच विजेच्या खांबांवर चढून घोषणा दिल्या.*

*दरम्यान, या परिस्थितीवर मार्ग काढण्यासाठी काल मराठा आरक्षणविषयक मंत्रिमंडळ उपसमितीच्या दोन बैठका झाल्या. मात्र त्यातून तोडगा निघाला नाही. आज वर्षा बंगल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत बैठक होत आहे.)*

**<><><><>**

हमासचा प्रवक्ता अबु ओबेदा गाझावरच्या हल्ल्यात मारला गेल्याचं इस्राएलने म्हटलं आहे. गेल्या शनिवारी इस्राएलने केलेल्या हवाई हल्ल्यात त्याचा मृत्यू झाल्याचं इस्राएलचे संरक्षण मंत्री इस्राएल कात्झ यांनी ट्विटरवर सांगितलं. अबु ओबेदा मारला गेल्यामुळे हमासच्या बाजूने बोलणी करण्यासाठी कोणीही नाही असा दावा इस्राएलचे प्रधानमंत्री बिन्यामिन नेतान्याहू यांनी केला आहे.

**<><><><>**

जम्मूमधे ढगफुटी आणि पुरामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा काल रात्री जम्मूत पोहोचले. राजभवन इथं ते आज आढावा बैठक घेतील. नायब राज्यपाल मनोज सिन्हा तसंच गृहमंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी त्यांना मदतकार्याची माहिती देतील.

दरम्यान, जम्मू-श्रीनगर महामार्गावरील वाहतूक आज अंशतः सुरू करण्यात आली आहे. तसंच बाधित भागातून वाहनांना बाहेर काढलं जात आहे.

<><><><>

जम्मूतली माता वैष्णोदेवी यात्रा अद्यापही स्थगित ठेवण्यात आली आहे. त्रिकुटा टेकडी परिसरात जरडी कोसळण्याची शक्यता लक्षात घेऊन गेला आठवडाभर यात्रा रोखण्यात आली होती. कटरा आणि वैष्णोदेवी परिसरात गेले काही दिवस संततधार पावसामुळे  बाणगंगा नदीला अचानक पूर आला असून यात्रेकरूंना सुरक्षित जागी हलवण्यात आलं. विविध ठिकाणी रस्त्यांवर दरडी कोसळल्यानं मार्ग बंद झाले आहेत. त्याचा राडरोडा हटवण्याचं काम सुरु आहे. अनेक यात्रेकरु मार्ग मोकळा होण्याची प्रतीक्षा करत कटरा इथं थांबले आहेत. मात्र मार्ग सुरक्षित झाल्याचा निर्वाळा सुरक्षा आणि तांत्रिक यंत्रणांकडून मिळेपर्यंत यात्रा स्थगित राहील, असं प्रशासनानं स्पष्ट केलं आहे.

<><><><>

जम्मू-काश्मीर, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि पंजाबमध्ये पूरग्रस्त भागात बचाव आणि मदत कार्य जोरात सुरू आहे. उत्तराखंडच्या अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस सुरू आहे. नागरिकांची सुरक्षितता आणि सुविधा यांना सरकारने सर्वोच्च प्राधान्य दिलं आहे, तसंच सर्व विभाग जलद मदत आणि बचाव कार्य करण्यासाठी समन्वयानं काम करत असल्याची माहिती उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी दिली आहे. हिमाचल प्रदेशात मुसळधार पाऊस सुरूच आहे. सततच्या पावसामुळे पंजाबमध्ये भीषण पूरस्थिती निर्माण झाली आहे. राज्य सरकारनं शाळांची सुटी बुधवारपर्यंत वाढवली आहे.

<><><><>

भारतीय हवामान विभागाने आज हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसासह एक दोन ठिकाणी अत्यंत मुसळधार पावसाचा लाल रंगाचा इशारा

जारी केला आहे. पुढील दोन दिवसांत पूर्व राजस्थान, हरियाणा, चंदीगड, दिल्ली, जम्मू आणि काश्मीर, लडाख, गिलगिट, बाल्टिस्तान, मुझफ्फराबाद, ओडिशा, पंजाब आणि उत्तर प्रदेशातील काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाजही हवामान विभागाने वर्तवला आहे.

**//<><><><>//**